बातमी

दैनिक
# मुक्तागिरी
थेट संवाद आपल्याशी...!
₹3

१२ सप्टेंबर २०१९ वर्ष २२ वे अंक १२० RNI Regd No. 69769/98 Regd. STR/014/2018-2020 पाने ८ Email : muktagiris

# शिवकृपा ही समाजाभिमुख पतसंस्था : अविनाश फडतरे

## सातारा शाखा नूतन कार्यालय उद्घाटन सोहळा

सातारा, दि. ११ (प्रतिनिधी) : 'महाराष्ट्रातील सहकारी पतसंस्था चळवळीमध्ये सहकार क्षेत्रात दीपस्तंभाप्रमाणे उत्कृष्ट व आदर्शवत काम करत सहकार चळवळीला दिशा देणारी व महाराष्ट्र शासनाचा 'सहकार भूषण' हा मानाचा पुरस्कार प्राप्त असलेली शिवकृपा सहकारी पतपेढी ही एक समाजाभिमुख पतसंस्था आहे,' असे गौरवोद्गार उद्घाटक अविनाश फडतरे यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जि. प. सातारा शाखा नूतन कार्यालय उद्घाटन प्रसंगी काढले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रिती काळे सहा. निबंधक सातारा या उपस्थित होत्या. शिवकृपाचे संस्थापक-अध्यक्ष कृष्णा शेलार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. उद्घाटन प्रसंगी उद्घाटक



**शाखेचे उद्घाटन करताना अविनाश फडतरे, कृष्णा शेलार व उपाध्यक्ष वसंतराव चव्हाण व संचालक मंडळ.**

अविनाश फडतरे यांनी संस्थेने महाराष्ट्रातील पतसंस्था चळवळीत गुणात्मक दृष्ट्या प्रथम क्रमांकावर असलेली व गेली ३७ वर्षे राज्यातील सहकार क्षेत्रात काम करीत असताना अर्थकारणाबरोबर सामाजिक बांधिलकी जोपासणे हे शिवकृपाने आद्य कर्तव्य मानून समाजाभिमुख कार्य संस्था करत आहे, असे प्रतिपादन केले. तसेच सहा. निबंधक प्रिती काळे यांनी सर्व कर्मचारी वर्ग प्रशिक्षित असल्यामुळे पाठपुराव्याने वसुली केल्याने कायदेशीर कारवाईचे प्रमाण इतर संस्थांच्या तुलनेत अत्यल्प आहे, असे सांगितले. प्रास्ताविकात संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष कृष्णा शेलार यांनी उपस्थितांचे स्वागत करून संस्थेच्या सांपत्तिक स्थितीमध्ये संस्थेच्या एकूण १०० शाखा, ७ विभागीय कार्यालय व १ प्रशासकीय कार्यालय यांच्या माध्यमातून संस्थेचे सभासद, ठेवीदार, हिंतचितक यांच्या विश्वासामुळे संस्थेने आज ठेवी २००१ कोटी तर कर्ज १५२८ कोटी असा एकूण ३५२९ कोटींचा संमिश्र व्यवसाय पूर्ण झाल्याची माहिती दिली. संस्थेच्या प्रगतीमध्ये संस्थेचे सभासद, ठेवीदार, हिंतचितक यांचा मोलाचा वाटा आहे, असे प्रतिपादन केले. या समारंभ प्रसंगी जि. प. सदस्या अर्चनाताई देशमुख, प्रदीप कांबळे, ह.भ.प. सापते महाराज, यांनी मनोगते व्यक्त केली व संस्थेला पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या व संस्थेचे पारदर्शक कामकाजाचे अवलोकन करून संस्थेमध्ये व्यवहार करावेत, असे उपस्थितांना आवाहन केले. तसेच संस्था सभासदांना तत्पर व कार्यक्षम सेवा देण्यासाठी सदैव कटिबध्द असेल, असे नमूद केले.

संतवाणी

प्रार्थना